# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक ३०१ वा शनिवार दि.११ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## अवसान गळाल्यानेच ठाकरे, पवारांबद्दल ममत्व

नागपूर : लोकसभा निवडणुकीच्या तिस–या टप्प्यातील मतदानानंतर भारतीय जनता पक्ष १५०, जागाही जिंकू शकत नाही, हे स्पष्ट झाले आहे. पराभव होत असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही खात्री पटली असल्यानेच याच चिंतेतून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना एनडीएमध्ये सहभागी होण्याची जाहीर ऑफर दिली आहे. शरद पवारांची एनसीपी व उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला नकली म्हणून टीका करता आणि ठाकरेंबद्दल ममत्व दाखवता आणि शरद पवारांना जाहीर ऑफर देता म्हणजे नरेंद्र मोदी यांनीच पराभवावर शिक्कामोर्तब केले असे प्रत्युत्तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिले.



महाराष्ट्राचे एक दिग्गज नेते ४० वर्षांपासून फिरत आहेत. बारामतीच्या निवडणुकीनंतर ते खूप चिंतेत आहेत. त्यांनी एक विधान केले आहे जे मला वाटते की, त्यांनी अनेकांसोबत चर्चा करुन केले असेल. ते इतके हताश आणि निराश झालेत की त्यांना वाटत आहे की, ४ जूनच्या नंतर राजकारणात टिकून राहायचे असेल तर छोट्या राजकीय पक्षांना काँग्रेसमध्ये विलीन व्हायला हवे. याचा अर्थ असा की, जी नकली राष्ट्रवादी आणि शिवसेना आहे, त्यांनी काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे. ४ जूननंतर काँग्रेसमध्ये जाऊन मरण्यापेक्षा छातीठोकपणे अजित पवार आणि एकनाथ शिंदेंसोबत या. मोठ्या अभिमानाने स्वप्ने साकार होतील, अशी ऑफरच पंतप्रधान मोदी यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरेंना नंदूरबार येथील जाहीर सभेत दिली. यावर नाना पटोलेंनी पलटवार केला. मोदी आता सत्तेत येत नाही

आधी पक्ष फोडले, ब्लॅकमेल केले आणि आता पुन्हा त्यांनाच आमच्यासोबत या, असे नरेंद्र मोदी सांगत आहोत. त्यामुळे नरेंद्र मोदी यांनी मान्य करावे की, आता ते काही सत्तेत येत नाहीत. आलो तरी त्यांचा आधार घेऊनच येऊ शकतो. ४०० पार नाही. आता आमच्यावर तडीपाराची वेळ आलेली आहे. म्हणूनच आता शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना विनंती करत आहेत की, आमच्या बरोबर या. त्यामुळे नरेंद्र मोदी आता सत्तेत येत नाही, असा आम्ही जो दावा करत आहोत, तो दावा खरा ठरत आहे, असे नाना पटोले म्हणाले.

मोदी काहीही बोलले तरी परिणाम होणार नाही

नरेंद्र मोदी घाबरलेले आहेत. सत्तेतून बाहेर जाण्याच्या भीतीने नरेंद्र मोदी अशा पद्धतीच्या ऑफर देत आहेत. भाजपाने लोकसभा निवडणुकीत सर्व प्रकारची कार्ड वापरली पण कोणतेच कार्ड चालले नाही, हिंदु-मुस्लीम कार्डही फेल गेले. त्यामुळे नरेंद्र मोदी यांना दररोज नवे कार्ड वापरावे लागत आहे. लोकशाहीमध्ये जनता सर्वश्रेष्ठ असते, नेता नाही. जनता आता नरेंद्र मोदींना कंटाळली आहे. त्यामुळे मोदी काहीही बोलले तरी आता त्याचा फारसा परिणाम होणार नाही, असे नाना पटोले म्हणाले.

४ जूनला इंडिया आघाडीचे सरकार येणार

पराभवाची भीती स्पष्ट दिसत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रातच २९ जाहीर सभा घेत आहेत. मोदींच्या हातातून निवडणूक गेली आहे, हे यातून स्पष्ट होत आहे. ज्यांच्यावर कठोर टीका केली त्यांनाच ऑफर देण्याची वेळ नरेंद्र मोदी यांच्यावर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शरद पवारांना ऑफर देणे म्हणजे ४ जूनला केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार येणार या राहुल गांधी यांच्या विधानाला नरेंद्र मोदी यांचा दुजोराच आहे असा दावा नाना पटोले यांनी केला आहे.

## मोदींची प्रकृती बरी नाही, पराभव दिसत असल्यानेच ऑफरची भाषा : संजय राऊत

नाशिक : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शारिरीक आणि मानसिक प्रकृती बरी नसावी. त्यामुळेच शरद पवार आणि उध्दव ठाकरे यांना ते एनडीएत येण्याची आॉफर देत आहेत. लोकसभा निवडणुकीत मोदींना त्यांचा पराभव दिसत असल्यामुळेच ते आता आॉफरची भाषा करू लागले असून, चार जून नंतर ते माजी पंतप्रधान होतील, असा दावा शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांनी केला आहे.



नंदूरबारमधील प्रचारसभेत बोलताना पंतप्रधान मोदी यांनी शरद पवार तसाच उध्दव ठाकरे यांना थेट एनडीएत येण्याचा प्रस्ताव दिला आहे. पंतप्रधान मोदींच्या या प्रस्तावानंतर विविध राजकीय प्रतिक्रिया उमटत आहेत. महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ दोन दिवसीय नाशिक दौऱ्यावर आलेल्या खा. राऊत यांनीही यावर भाष्य करताना पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला. पंतप्रधान मोदी हे भानावर नाहीत, त्यामुळेच ते अशा प्रकारची विधाने करत आहेत, असे ते म्हणाले. या आॉफरमधून मोदींची पराभवाची भीती व्यक्त होत आहे. 'अब की बार ४०० पार' असा नारा मोदींनी दिला असला तरी ते यंदाच्या लोकसभा निवडणुकीत दोनशे जागांचा आकडा देखील पार करू शकणार नाहीत. भाजपचा खेळ १७५ ते १८०मध्येच संपले. मोदी हे चार जून नंतर पंतप्रधान राहणार नाहीत. ते माजी पंतप्रधान होतील, असा दावाही राऊत यांनी केला.

सुरूवातीला गुजरातेतील पांढरा कांदा निर्यातीला केंद्राने दिलेली परवानगी आणि त्यानंतर कांदा निर्यात बंदीचे जुनेच आदेश नव्याने दाखवून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची केली जाणारी फसवणूक यावरही राऊत यांनी भाजप सरकारवर टीका केली. केंद्रातील मोदी सरकार हे फसवणूक करणारे सरकार आहे. गुजरातमध्ये निवडणूक जिंकता यावी, यासाठी हा सारा उद्योग केला. फक्त गुजरातमधील व्यापारी आणि शेतकरी जगावा यासाठी हा सारा अट्टहास सुरू आहे. मोदी हे देशाचे नव्हे तर केवळ गुजरातचे पंतप्रधान आहेत, असा पुनरूच्चार करत मोदी पाकीस्तानचे एजंट असल्याचा गंभीर आरोपही राऊत यांनी केला आहे.

## म्हणून गोडसेंच्या हाती दिला नारळ, शांतीगिरी महाराज यांचा सिन्नर भेटीबाबत गौप्यस्फोट

नाशिक : लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या सिन्नर येथील भेटी प्रसंगी बादलीला मतदान करावे, असा संदेश देताना हाती नारळ सोपविला. नारळसोबत तुम्ही घरी राहाण्याचा आशिर्वाद दिला, असा गौप्यस्फोट अपक्ष शांतिगिरी महाराज यांनी शुक्रवारी (दि. १०) पत्रकार परिषदेत केला. मंत्री छगन भुजबळ यांची सदिच्छा भेट असल्याची त्यांनी स्पष्ट केले.नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी २० मे रोजी मतदान घेण्यात येणार आहे. उमदेवार सध्या गावोगावी प्रचार रॅली घेत आहेत. सिन्नर येथे गुरुवारी (दि. ९) अशाच प्रचार रॅलीदरम्यान युतीचे उमेदवार गोडसे व अपक्ष शांतिगिरी महाराज समोरासमोर आले. या भेटीबाबात शांतिगिरी महाराज यांना विचारले असता योगायोगाने ही भेट झाली. पण या भेटीवेळी गोडसे यांना बादलीकडे लक्ष ठेवताना तुमचे मत बादलीत टाकावे. तसेच नारळ हाती देत तुम्ही या नारळासोबत घरी राहावे, असे त्यांना सांगितल्याचे शांतीगिरी महाराज यांनी स्पष्ट केले.



शांतिगिरी महाराज पुढे म्हणाले, भुजबळ फार्म येथे मंत्री भुजबळ यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी गेला होतो. उमेदवार म्हणून नागरिकांच्या गाठीभेटी घ्याव्याच लागणार असे सांगताना भुजबळांशी अनपौचारिक गप्पा झाल्याचे ते म्हणाले. भाजपचे दिनकर पाटील यांच्या भेटीवर बोलताना त्यांचे व आमचे मैत्रीपूर्ण नाते आहे. आम्ही नेहमीच भेटतो असे सांगत शांतीगिरी यांनी त्यावर अधिकचे भाष्य करणे टाळले.

## ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप निश्चित

नवी दिल्ली : महिला कुस्तीपटूंच्या कथित लैंगिक शोषणप्रकरणी कुस्ती संघटनेचे माजी अध्यक्ष आणि भाजप नेते ब्रिजभूषण शरण सिंह यांना दिल्लीच्याा राऊस एव्हेन्यू न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. न्यायालयाने ब्रिजभूषण यांच्यावर आरोप निश्चित करण्याचे आदेश दिले आहेत. यासोबतच ब्रिजभूषण सचिव विनोद तोमर यांच्यावर आरोप निश्चित करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. ब्रिजभूषण यांच्यावर आरोप निश्चित करण्यासाठी पुरेसे पुरावे असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.



ब्रिज भूषण यांच्यावर कलम ३५४ (महिलेचा विनयभंग करण्याच्या हेतूने तिच्यावर हल्ला करणेकिंवा गुन्हेगारी बळजबरी करणे), ३५४-अ (लैंगिक छळ) आणि कलम ५०६ (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत आरोप निश्चित करण्याचे आदेश देण्यात आले. विनोद तोमर यांच्यावर कलम ५०६(१) अंतर्गत आरोप निश्चित करण्याचे पुरावे असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. १५ जून २०२३ रोजी दिल्ली पोलिसांनी ब्रिजभूषण सिंह विरुद्ध कलम ३५४ (महिलेचा विनयभंग करण्याच्या हेतूने तिच्यावर हल्ला करणे किंवा गुन्हेगारी बळजबरी करणे), ३५४-अ (लैंगिक छळ), ३५४- आणि कलम ५०६ (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत आरोपपत्र दाखल करण्यात आले.

## दहावीसह बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणा-या इयत्ता दहावी परीक्षा शुल्कात वाढ करण्याचा निर्णय राज्य मंडळ कार्यकारी परिषदेने घेतला आहे. त्यानुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा जुलै- ऑगस्ट २०२४ आणि मुख्य परीक्षा-२०२५ साठी सुधारित शुल्क आकारण्यात येणार आहे. दहावीच्या नियमित तसेच पुनर्परीक्षार्थीसाठी परीक्षा शुल्क ४२० रुपयांवरून ४७० तसेच खासगी विद्यार्थी अर्ज आणि नोंदणी शुल्क असे एकूण १ हजार ३४० रुपये एवढे झाले आहे.



राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी दहावीच्या सुधारित परीक्षा शुल्कासंदर्भात परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार दहावीची परीक्षा देणा-या नियमित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क ४७० रुपये, प्रशासकीय शुल्क २०, गुणपत्रिका लॅमिनेशन २० रुपये शुल्क, प्रमाणपत्र २० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (शास्त्र विषय) १० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (तंत्र विषय) १०० रुपये तसेच खासगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज (माहिती पुस्तिकेसह) १३० रुपये आणि नोंदणी शुल्क १ हजार २१० रुपये आकारले जाणार आहेत.

पुनर्परीक्षार्थी आणि तुरळक विषय घेऊन परीक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांच्या सुधारित परीक्षा शुल्क ४७०, प्रशासकीय शुल्क २०, गुणपत्रिका लॅमिनेशनसह शुल्क २०, प्रात्यक्षिक परीक्षा शास्त्र विषय १० आणि प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (तंत्र विषय) १०० रुपये एवढे असणार आहे, तर श्रेणी सुधारण्यासाठी प्रविष्ट होणा-या नियमित आणि खासगी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क ९३० रुपये, प्रशासकीय शुल्क २०, गुणपत्रिका शुल्क २०, प्रात्यक्षिक शास्त्र १० आणि तंत्र विषय १०० रुपये, अशी वाढ झाली आहे.

### राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख



यांनी शुक्रवार दि. १० मे रोजी सकाळी बाभळगाव येथे महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन केले. यावेळी त्यांनी सर्वांना महात्मा बसवेश्वर जयंती, परशुराम जयंती व अक्षय तृतीयानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## मनोज जरांगे आरक्षणाचे हिरो

बीड : महाराष्ट्रात चौथ्या टप्प्यात ११ लोकसभा मतदारसंघात मतदान होत असून बीड जिल्ह्यातही १३ मे रोजी मतदान होत आहे. त्यामुळे, मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून सध्या बीड लोकसभा मतदारसंघात राजकारण तापलं आहे. त्याच पार्श्वभूमीवर दोन्ही नेत्यांकडून या मुद्दयासंदर्भात भाष्य केले जाते. दरम्यान, पंकजा मुंडेंनी बीड जिल्ह्याच्या नेकनूर येथील सभेत मराठा समाजाला आवाहन करताना नाव न घेता शरद पवारांवर निशाणा साधला. गेली ६०-६५ वर्षे हे झोपले होते का, आता आरक्षणच्या मुद्द्याला मुखवटा बनवून राष्ट्रवादीचे लोकं मतं मागत आहेत. गेल्या ५०-६० वर्षे त्यांना कधीच वाटलं नाही, जातीचे बघावे असे म्हणत पंकजा यांनी राष्ट्रवादीच्या उमेदवारावर हल्लाबोल केला.



काळजावर हात ठेऊन सांगा, मी कधी जातीवाद केलाय का?, असा सवाल पंकजा यांनी उपस्थितांना उद्देशून केला. अहिल्यादेवींनी जसा राज्य कारभार केला, जिजाऊंनी जसे शौर्य दाखवले जसे धैर्य सावित्रीबाई फुलेंनी वापरले. तसेच, शौर्य, धैर्य आणि औदार्य दाखवण्याची गरज आता महिला भगिनींवर आली आहे. माझ्या जिल्ह्याच्या बंधुभावाची, माझ्या जिल्ह्याच्या सुंदर सलोख्याची तस्करी करण्याचे प्रयत्न हाणून पाडा, असे म्हणत पंकजा यांनी नाव न घेता बजरंग सोनवणेंवर निशाणा साधला.

पंकजा मुंडेंनी ट्रोलर्संनाही सुनावले, कुणी ट्रोल केले, फेसबुकवर आपल्यावर कमेंट केली तर आपल्याला गोळी लागते का?. ट्रोलर्संकडे लक्ष देऊ नका, ती किरायाने आणलेली माणसे असतात. आता आरक्षणच्या मुद्याला मुखवट बनवून राष्ट्रवादीचे लोकं मते मागत आहेत. गेल्या ५०-६० वर्षे त्यांना कधीच वाटले नाही, जातीचं बघावं असे म्हणत पंकजा यांनी नाव न घेता शरद पवारांवर हल्लाबोल केला.

## संपादकीय....

# विज्ञाननिष्ठ महात्मा बसवेश्वर

समाजातील वर्गभेद, वर्णभेद, लिंगभेद व जातिभेद नष्ट करून समतेच्या तत्त्वासाठी व नवविचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी बाराव्या शतकात महात्मा बसवण्णा ऊर्फ बसवेश्वर यांनी लिंगायत विचारधारा समाजात रुजविली. त्यांनी समताधिष्ठित लिंगायत धर्माची स्थापना केली. या धर्माचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हा धर्म विज्ञाननिष्ठ आहे. आज बसवेश्वर यांच्या जयंतीच्या निमित्ताने.

धर्म आणि विज्ञान यांच्यात समन्वय असेल तरच तो समाज प्रगती करू शकतो. धर्म आणि विज्ञानाची दोहोंची फारकत झाली तर तो समाज भरकटत जातो. २१ व्या शतकात विज्ञानामुळे विविध क्षेत्रांत नेत्रदीपक प्रगती केलेली आहे; परंतु या प्रगतीस धार्मिक अधिष्ठान नसल्यामुळे भौतिक प्रगती होऊनही मानवाला आत्मिक समाधान मिळत नाही. लिंगायत धर्म हा विज्ञानाच्या कसोटीवर उतरलेला धर्म आहे. या धर्मात अंधश्रद्धा, कर्मकांड, जुनाट रूढी, अनावश्यक प्रथा व परंपरा यांना स्थान नाही. हा धर्म एकेश्वरवादाचे समर्थन करतो व मूर्तिपूजेस विरोध करतो. वर्ण व्यवस्था, जातिभेद, अस्पृश्यता, स्त्री दास्यत्व, देवदासी प्रथा यांना या धर्मात स्थान नाही. तसेच बळी देण्याची प्रथा, पशुहत्या, हिंसा, नवस सायास व्रतवैकल्ये, तीर्थाटन–यात्रा, यज्ञ, होमहवन, ढोंगबाजी, बुवाबाजी, भोंदूगिरी, चमत्कार, ऐतखाऊ भिक्षा वृत्ती यांना बसवण्णांनी विरोध केला. तसेच मंदिर संस्कृती, पुरोहितशाही, जादूटोणा, तंत्र–मंत्र, भूत–पिशाच्च, खासगी सावकारी, व्याज देणे–घेणे या बाबी लिंगायत धर्मात निंद्य आहेत.

पंचांग, शुभ वेळ, शुभ दिवस, ज्योतिष, भविष्य, नक्षत्र, तिथी या गोष्टी लिंगायत धर्मात मान्य नाही. प्रत्येक वेळ ही शुभ व प्रत्येक दिवस हा शुभच असतो. सुतक, विटाळ, सोवळे ओवळे, शकुन–अपशकुन, पीजेचे अवडंबर या बाबी या धर्मात मानत नाहीत. वेद, वेदांगे, आगम, उपनिषदे आदींना या धर्मात स्थान नाही. उपवासाला या धर्मात धार्मिक अधिष्ठान नाही, तर वैज्ञानिक अधिष्ठान आहे. थोडक्यात, शाकाहाराचा पुरस्कार करणारा हा प्रगत, वैज्ञानिक धर्म आहे.

स्वर्ग व नरक या कल्पना लिंगायत धर्माने नाकारलेल्या आहेत. वैदिक धर्मशास्त्रानुसार सत्कार्य करणारेच स्वर्गात जातात व दुष्कृत्य करणारे, घोर अपराध करणारे नरकात जातात. प्रत्येक व्यक्तीच्या कर्मानुसार या गोष्टी ठरत असतात. प्रत्येकाच्या कर्माचा हिशेब ठेवणारा चित्रगुप्त असून, त्याच्या वरचा अधिकारी म्हणजे यम होय. यमाच्या आज्ञेनुसार चित्रगुप्त प्रत्येक व्यक्तीच्या कार्याची कागदपत्रे योग्यरीतीने हाताळून ज्याच्या त्याच्या नफा–तोट्याप्रमाणे स्वर्गात किंवा नरकात पाठवतो. कर्माचा सिद्धांत स्वीकारल्यामुळे समाजात वर्षानुवर्षे असा समज होता व आजही आहे.

बसवण्णांनी स्वर्ग–नरक या संकल्पना नाकारल्या आहेत. त्यांच्या मते स्वर्ग कुठे तरी वर आहे व नरक कुठे तरी खाली आहे, याला कोणताही वैज्ञानिक आधार नाही. या केवळ काल्पनिक कथा होत. सत्य बोलणे, सदाचरण हेच स्वर्ग निर्माण करते, तर आपले खोटे बोलणे, वाईट आचरण (अनाचार) नरक निर्माण करते. नैतिक आचरणातून पृथ्वीवरच स्वर्ग निर्माण करता येतो, अशी शिकवण बसवण्णा यांनी दिली. व्यक्तीच्या निधनानंतर त्याचा जीव नाश पावत नाही, तर तो जीव एका शरीरातून दुसर्या शरीरात प्रवेश करून पुनर्जन्म प्राप्त करतो, हा सिद्धांत आपल्या देशात अनेक प्रमुख धर्मांनी मान्य केलेला आहे; पण पुनर्जन्मास कोणताही शास्त्रीय आधार नसल्यामुळे हा सिद्धांत बसवण्णांनी पूर्णपणे नाकारला आहे. लिंगायत धर्मशास्त्रानुसार व्यक्तीचा देह नाश पावल्यानंतर शिवामधून आलेला जीव पुन्हा शिवामध्येच विलीन होतो. जीव व शिव यांच्या एक होण्याच्या स्थितीला लिंगायत लोक लिंगैक्य किंवा शिवैक्य म्हणतात. जशा समुद्रात निर्माण झालेल्या लाटा समुद्रातच विलीन होतात. लिंगायत धर्म तत्त्वज्ञानात जीव शिवाशी तादात्म्य पावल्यानंतर पुनर्जन्माचा प्रश्नच उद्भवत नाही.

# शरदरावांचा 'यॉर्कर'

लोकसभा निवडणुकीनंतर अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील असे वक्तव्य ज्येष्ठ नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे(शरद पवार) अध्यक्ष शरद पवार यांनी राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून दिली आहे. शरद पवारांच्या वक्तव्यावरून अनेक राजकीय तर्क लावले जात आहेत. काँग्रेसने या वक्तव्याचे स्वागत व समर्थन केले आहे, तर भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वक्तव्याची खिल्ली उडवली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर सर्वच प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील. प्रादेशिक पक्षांना त्यांचा पराभव लक्षात आला आहे. त्यांचे अस्तित्व टिकवायचे असेल तर त्यांना काँग्रेसमध्ये जावेच लागेल. त्यामुळे शरद पवारांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन होईल. त्यांचे अस्तित्व संपुष्टात येईल असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. एका इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत पवार यांनी लोकसभा निवडणुकीनंतर अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसच्या आणखी जवळ जातील, काही पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील असे म्हटले आहे. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात कोणताही फरक दिसत नाही.

वैचारिकदृष्ट्या आम्ही गांधी, नेहरूंची विचारसरणी मानणारे आहोत, हे त्यांचे वक्तव्य दोन्ही काँग्रेसच्या विलीनीकरणाचे संकेत असल्याचे मानले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार आमच्या पचनी पडणे अवघड आहे असेही पवार म्हणाले. येणारा काळ राजकीय स्थित्यंतराचा असेल असे सांगून पवार म्हणाले, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे विचारदेखील समविचारी पक्षांसोबत एकत्र काम करण्यासंबंधी सकारात्मक आहेत. मी त्यांची विचारसरणी जवळून पाहिली आहे. लोकसभेची निवडणूक सुरू असताना शरद पवार यांनी केलेल्या वक्तव्यामुळे त्यांच्या हेतूबद्दल संशय व्यक्त केला जात आहे. शरद पवार यांना उद्धव ठाकरे यांची मशाल विझवायची आहे का, अशी शंकाही व्यक्त केली जात आहे. लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे अजून शिल्लक असताना पवार यांनी केलेल्या या वक्तव्यामुळे मतदारांच्या मनात ठाकरे गटाबद्दल संभ्रम निर्माण झाल्याने ते त्यांना मतदान करणार नाहीत. परिणामी ठाकरे यांचे अनेक उमेदवार पडतील आणि तसे झाले तर मशालच विझेल अशी भीती व्यक्त केली जात आहे. शरद पवारच ठाकरे गटाला संपवायला निघाले आहेत



असेही बोलले जात आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे गटाला घातक ठरणारे वक्तव्य शरद पवारांनी नेमके का केले हा प्रश्नच आहे. महाराष्ट्राचे राजकारण आजही शरद पवारांभोवती फिरताना दिसून येत आहे. शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही काँग्रेसमध्ये विलीन होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यावर खुलासा करताना शरद पवार म्हणाले, सहका–यांशी चर्चा केल्याशिवाय मी काहीही बोलणार नाही. आमच्या पक्षाबद्दल कोणतेही पाऊल उचलताना किंवा रणनीती ठरवताना सामूहिक पद्धतीने निर्णय घेतला जाईल. लोकसभा निवडणुकीनंतर देशासह महाराष्ट्राचे राजकारण नवे वळण घेईल याचे आता संकेत मिळू लागले आहेत. निवडणुका सुरू असताना आणि महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर शरद पवारांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होईल अशी शक्यता वर्तवण्यात येत होती. त्यानंतर आता शरद पवारांनी पुन्हा एकदा प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील असे वक्तव्य केले आहे. शरद पवार यांनी आजपर्यंत केलेली अनेक वक्तव्ये आणि त्यांचे टायमिंग लक्षात घेता आताच्या वक्तव्याला निश्चितच काहीतरी अर्थ आहे. लोकसभा निवडणुकीनंतर विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू होईल.

या वक्तव्याचे दोन अर्थ निघू शकतात. एक म्हणजे, पंतप्रधान मोदी तिस–यांदा पंतप्रधान झाले तरी काँग्रेसला एकत्रीकरण आणि विलीनीकरणाची मोहीम राबवावी लागेल. दुसरे म्हणजे या निवडणुकीत मोदींना सत्ता मिळाली नाही किंवा अपेक्षित यश मिळाले नाही तरी सुद्धा काँग्रेस आणि मित्रपक्षांमध्ये विलीनीकरण आणि एकत्रीकरणाची मोहीम राबवावी लागेल. लोकसभा निवडणुकीनंतर मतदारांनी कोणताही कौल दिला तरी देशातील विविध प्रादेशिक पक्ष काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू होईल असेच शरद पवारांना म्हणायचे आहे असे दिसते. गत काही वर्षांपासून भाजप ज्या प्रकारचे प्रभावशाली राजकारण करत आहे त्याला तोडीस तोड उत्तर द्यायचे असेल तर काँग्रेससारख्या एखाद्या राष्ट्रीय पक्षाच्या नेतृत्वाखालीच उत्तर देणे शक्य होणार आहे याची जाणीव पुन्हा एकदा करून देण्याचे काम शरद पवारांनी केले आहे. काही दिवसांपूर्वी पृथ्वीराज चव्हाण यांनीही अशाच प्रकारचे मत व्यक्त केले होते. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला चांगले यश मिळाले तर या प्रयोगाला आणखी वेग येण्याची शक्यता आहे. ऐन निवडणुकीच्या कालावधीत शरद पवार यांच्यासारखा ज्येष्ठ नेता जेव्हा एखादे वक्तव्य करतो तेव्हा त्या विधानास निश्चितच खूप महत्त्व असते.

लोकसभा निवडणुकीनंतर अनेक छोटे–मोठे प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन झाले किंवा काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र आले तर काँग्रेसची ताकद निश्चितच वाढणार आहे. काही राज्यांत काँग्रेसमधून बाहेर पडलेले प्रादेशिक पक्ष एवढे मोठे झाले आहेत की ते पुन्हा मूळ पक्षात सामील होतील असे वाटत नाही. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस हे त्याचे उदाहरण. उत्तर प्रदेशमधील समाजवादी पक्ष, बिहारमधील लालुप्रसाद यांचा राष्ट्रीय जनता दल किंवा दक्षिण भारतातील द्रमुकसारखा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होण्याची शक्यता खूपच कमी आहे पण हे पक्ष काँग्रेसच्या झेंड्याखाली मात्र निश्चितच एकत्र येऊ शकतील. शरद पवारांना आपल्या मुलाखतीद्वारे हेच सुचवायचे असेल. पण शरद पवार बोलतात एक आणि करतात दुसरेच अशी त्यांची ख्याती आहे. या आधी शरद पवार आणि फडणवीस यांच्यात गुगली–चायनामनची जुगलबंदी झाली आहे. आता पवारांनी टाकलेला 'यॉर्कर' कुणाच्या दांड्या उद्ध्वस्त करतो ते बघायचे!

# जनता रस्त्यावर, नेते रथावर



सध्याच्या काळात नेते आणि पक्षाला सभेसाठी गर्दी जमवणे किती अवघड असते, हे कळून चुकले आहे. खर्च देखील किती होतो, हे देखील त्यांना चांगलेच ठाऊक असते. शहरात कोणाकडेच वेळ नाही आणि एखाद्या कोप–यात आयोजित सभेला जावे एवढी उत्सुकता शहरातील नागरिकांना नसते. शहरात सभा आयोजित करणे महागडे ठरते. खर्चाचा हिशेब द्यावा लागतो. या सर्व भानगडीपासून वाचण्यासाठी साधा आणि सोपा उपाय म्हणजे रोड शो. या शो दरम्यान क्रेनच्या मदतीने भलामोठा हार नेत्याच्या गळ्यात घातला जातो. जनतेने टाकलेल्या फुलांव्यतिरिक्त जेसीबीभरून फुले टाकली जातात. यात ना भाषण असते ना मिरवणूक. रोड शोंचे बदलते स्वरूप पाहता आता त्यांच्या राजकीय रोड शोसाठी एका पुरस्काराचे आयोजन करायला हवे. कारण यात ॲक्शन, ड्रामा, उत्सुकता, विनोद, नाट्य, रहस्य, कौटुंबिक नाट्य अशा सर्व कला पहावयास मिळतात.

निवडणुकीचा हंगाम सुरू होताच वेगवेगळ्या प्रकारचे शो आपल्याला पहावयास मिळतात. माध्यमांतील चर्चासत्र, नेत्यांचे परिसंवाद आणि राजकीय पक्षांचे शो असे नानाविध कार्यक्रम दिसतात आणि यात प्रेक्षक असते जनता. या सर्व कार्यक्रमांतही सर्वाधिक चर्चा असते ती 'रोड शो'ची. एखाद्या मतदारसंघातील महत्त्वाच्या भागात 'रोड शो'चे आयोजन केले जाते. ही एक प्रकारे एक्सक्लुझिव्ह घटना असते. आमच्या मते हा एक नावीन्यपूर्ण प्रकार आहे. परंतु सध्याच्या रोड शोचे स्वरूप पाहिले तर ते साजेसे वाटत नाही. यापूर्वी देखील मोठ्या प्रमाणात रोड शो झाले आहेत. परंतु आता या नावावर वेगळेच कार्यक्रम जनतेसमोर सादर केले जात आहेत. निवडणुकीच्या हंगामात रोड शोचा अर्थ नेते, उमेदवार यांची मुख्य, प्रमुख मार्गावरून भ्रमंती. रोड शो हे नाव अगदी अचूक वाटते. कारण हा शो रस्त्यावरच केला जातो.

नेतेमंडळी सजविलेल्या रथात, गाड्यांवर एखाद्या राजा–महाराजाप्रमाणे उभे राहून जनतेला दर्शन देतात आणि शहरातील महत्त्वाच्या मार्गावरून जातात. मागे गाड्यांचा भलाभोठा ताफा असतो. सुरक्षा रक्षकांची फौज असते. नेत्यांवर फुलांचा वर्षाव होतो. या रोड शो दरम्यान क्रेनच्या मदतीने भलामोठा हार नेत्याच्या गळ्यात घातला जातो. जनतेने टाकलेल्या फुलांव्यतिरिक्त जेसीबीभरून फुले टाकली जातात. हा खेळ दोन ते तीन किलोमीटर चालतो आणि समारोप होतो. यात ना भाषण असते ना मिरवणूक. केवळ नेत्यांकडून अभिवादन केले जाते, नमस्कार केला जातो. रोड शोचे वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ शहरात विशेषत: महानगरातच आयोजित केले जातात. दुसरीकडे गावात, खेडोपाडी, दुर्गम भागात रोड शो ऐवजी सभांचे आयोजन केले जाते. या ठिकाणी नेतेमंडळी 'पवन यान' म्हणजेच हेलिकॉप्टरने उतरतात आणि भाषण देऊन पुढे जातात. तेथे रोड शो होत नाहीत. काही नेते कधी कधी ग्रामीण भागात पदयात्रा काढतात, परंतु त्याचे प्रमाण खूपच कमी आहे आणि कालांतराने ते इतिहासजमाही होईल. शहरांची गोष्ट वेगळी आहे. तेथे झगमगाट असतो, रौनक असते. तेथे रॅली किंवा सभा नाही तर रोड शो होतो. एखाद्या निवडणूक मॅनेजमेंटने ठरवून दिलेल्या कार्यक्रमपत्रिकेनुसार सर्वकाही पार पाडले जाते.

सध्याच्या काळात नेते आणि पक्षाला सभेसाठी गर्दी जमवणे किती अवघड असते, हे कळून चुकले आहे. खर्च किती होतो, हे देखील त्यांना चांगलेच ठाऊक असते. शहरात कोणाकडेच वेळ नाही आणि एखाद्या कोप–यात आयोजित सभेला जावे एवढी उत्सुकता शहरातील नागरिकांना नसते. शहरात सभा आयोजित करणे महागडे ठरते. खर्चाचा हिशेब द्यावा लागतो. या सर्व भानगडीपासून वाचण्यासाठी साधा आणि सोपा उपाय म्हणजे रोड शो. कोणत्याही गर्दीच्या ठिकाणचा रस्ता निवडा. तेथे हजारो नागरिक अगोदरपासूनच असतात. रस्त्यावर झेंडे, फुलं आणि बॅनरची व्यवस्था झाली की झाला रोड शो. गर्दीचे ठिकाण असल्याने नागरिक रस्त्यावर असतातच. कमी खर्चात पक्षाचे ध्येय पूर्ण होते. गल्लीत पदयात्रा काढण्याची गरज नाही आणि लोकांचे टोमणे ऐकण्याचाही ताण नाही. केवळ रथावर उभे राहून अभिवादन करणे एवढेच काम. पादचारी आणि दुकानदारांचेही मनोरंजन होते आणि त्यांना पाहण्याची संधी देखील मिळते.

मनोरंजनाचा विषय निघाला तर रोड शोची संकल्पना ही सर्वप्रथम कलाकारांकडून मांडली गेली आहे. शहरातील रस्त्यावर फिरून आयोजित केल्या जाणा–या नाचगाण्याच्या कार्यक्रमाला रोड शो म्हटले जायचे. जुन्या काळात चित्रपटाचा प्रसार करण्यासाठी रिक्षावर भोंगा लावून तो गल्लोगल्ली फिरवला जायचा. त्यालाही रोड शो म्हटले जायचे. फिरणारा सर्कस किंवा मनोरंजननगरी देखील रोड शोचाच प्रकार आहे. कंपनीचा आयपीओ म्हणजे शेअर लाँच करताना देखील अशाच प्रकारे प्रचार व्हायचा किंवा बाहेरील देशातील गुंतवणूक करणा–या मंडळींना आकर्षित करण्यासाठी रोड शो सारख्या कार्यक्रमांचे आयोजन केले जायचे. सर्व ठिकाणी अशाच प्रकारची सिस्टीम पहावयास मिळते. आता हीच गोष्ट नेत्यांनी राजकीय प्रचारासाठी अंगीकारली आणि त्याला रोड शो असे म्हटले जात आहे. रोड शो हा केवळ भारतापुरताच मर्यादित नाही. त्याचे आयोजन अमेरिकेतही होते. फरक एवढाच की आपल्याकडे रस्त्यावर नेते रथावर उभे राहून अभिवादन करतात, परंतु अमेरिकेत नेते मात्र वेगवेगळ्या शहरात जाऊन तेथील सभागृहात किंवा लहान मैदानावर जनतेशी थेट संवाद साधतात. आपली भूमिका मांडतात. यावर्षी अध्यक्षपदाच्या निवडणुकीत अध्यक्ष जो बायडेन आणि माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे वेगवेगळ्या राज्यांत आणि शहरांत समर्थकांसमोर प्रचार करत आहेत, त्याला रोड शो असे म्हटले जाते.

वेळोवेळी आपण काश्मीर ते कन्याकुमारी आणि गुजरात ते आसामपर्यंत आणि याशिवाय अनेक मोठ्या पक्षांचे वेगवेगळ्या प्रकारचे मनोरंजक रोड शो पाहिले आहेत. राजकीय नेत्यांनी या शोमध्ये दमदार कामगिरी केली आणि यातही एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला. किती गर्दी जमवायची, किती तयारी करायची, किती लोक येणार यासाठी सर्व नियोजन केले जाते. प्रारंभीच्या काळात रोड शोसाठी चित्रपट कलाकारांना आणले जात असे. आता त्यांचेही आकर्षण कमी झाले आहे. रोड शोमध्ये चित्रपट कलाकार कमीच झाले आहेत. पण स्टार नेते किंवा स्टार प्रचारकच सेलिब्रेटी ठरत आहेत, कलाकार आहेत. वास्तविक नेता हाच सर्वांत मोठा अभिनेता असतो. आता त्यांच्या राजकीय रोड शोसाठी एका पुरस्काराचे आयोजन करायला हवे. कारण यात ॲक्शन, ड्रामा, उत्सुकता, विनोद, नाट्य, रहस्य, कौटुंबिक नाट्य अशा सर्व कला पहावयास मिळतात.

भारतात राजकारणात रोड शो कोणी आणला किंवा असा ड्रामा कोणी सुरू केला, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. तर नाव ऐकून घ्या, दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी. त्यांनीच या प्रकारच्या कार्यक्रमांना सुरुवात केली. निवडणुकीच्या काळात त्यांनी दिल्ली अणि रायबरेली येथे खुल्या जीप किंवा मोटारीत उभे राहून रस्त्यावर फिरण्यास सुरुवात केली. याप्रकारे ती रोड शोची पायाभरणी होती. त्यांनी रायबरेली येथे मुलगा राजीव अणि सून सोनिया यांना सोबत घेत खुल्या जीपमध्ये रस्त्यावर रोड शो केला होता. अशा प्रकारच्या रोड शोमध्ये इंदिरा गांधी या गळ्यातील फुलांचा हार लोकांवर फेकत असत. त्याला प्रसाद मानत तो हार पकडण्यासाठी जनतेची झुंबड उडायची. तेव्हा त्याला रोड शो म्हटले जात नसे. कदाचित काही नाव देखील नसेल. परंतु आता हे सर्व शो आहेत. त्याचे रोड शो असे नामकरण झाले आहे.

# २००० लोकांच्या निरीक्षणातून तज्ज्ञांनी मांडलं आजार टाळण्याचं सूत्र; २४ तासांचे व कामाचे विभाजन कसं करावं, पाहा वेळापत्रक

पळापळीच्या आयुष्यात आज आपल्याला दोन निवांत क्षण बसायला वेळ नाही हे तक्रार सर्वांचीच आहे. पण गंमत म्हणजे हे पळापळ सुद्धा आपण बसूनच करतो, कामासाठी आठ तास, प्रवासासाठी चार तास आणि उरलेले झोपायचे तास, मुद्दा काय तर बसल्या बसल्या सुद्धा दिवस आपल्याला थकवत असतो. इतका वेळ बसून राहिल्याने आपल्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतोच हे काही वेगळं सांगायला नको. अलीकडेच एका अभ्यासात सुद्धा सांगितल्याप्रमाणे, बैठ्या जीवनशैलीचा सर्वात वाईट प्रभाव हा हृदयावर होत असतो, याशिवाय मधुमेह व काही वेळा तर कर्करोगाला सुद्धा हा बसून काढलेला दिवस कारणीभूत ठरू शकतो.

हे सगळं कितीही पटत असलं तरी यावर उपाय काय? निरोगी राहण्याचं सूत्र जुळवायचं कसं? हे प्रश्न तुम्हाला पडत असतील तर ऑस्ट्रेलियसह अन्य राष्ट्रांमधील काही संशोधकांनी तयार केलेल्या बसण्या-उठण्याच्या, हालचालीच्या, व्यायामाच्या, झोपण्याच्या वेळापत्रकाची तुम्हाला खूप मदत होऊ शकते. चला तर मग हे वेळापत्रक आपणही पाहूया..

डायबेटोलॉजिया या वैद्यकीय जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात, ४० ते ७५ या वयोगटातील तब्बल २००० हुन अधिक सहभागींचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. या सहभागींच्या दिवसभरातील हालचालींवरून संशोधकांनी आदर्श वेळापत्रक तयार केले आहे.आपण दिवसभरात तासांचे व हालचालींचे विभाजन कसे करावे?



सहा तास: बसणे पाच तास आणि १० मिनिटे: उभे वाहने

दोन तास आणि १० मिनिटे: हलकी ते मध्यम शारीरिक क्रिया (प्रति मिनिट १०० पावले पेक्षा कमी)

दोन तास आणि १० मिनिटे: मध्यम-ते-जोमदार शारीरिक क्रियाकलाप (प्रति मिनिट १०० पेक्षा जास्त पावले)

आठ तास आणि २० मिनिटे: झोप

अभ्यासकांनी नोंदवलेले निरीक्षण

या अभ्यासात एक स्पष्ट निरीक्षण असे नोंदवण्यात आले की, कमी बसणे, अधिक उभे राहणे, क्रियाकलाप आणि झोप हे आरोग्याच्या चांगल्या परिणामांशी संबंधित होते. विशेष म्हणजे, जेव्हा टाइप २ मधुमेह असलेल्या सहभागींनी या वेळा पाळल्या तेव्हा त्यांच्या रक्तातील साखरेच्या नियंत्रणात लक्षणीय सुधारणा दिसून आली होती. अर्थात एखाद्या व्यक्तीच्या सर्केडियन लयीनुसार व झोपेच्या गुणवत्तेवर आधारित झोपेच्या कालावधीचे प्रमाण बदलू शकते.तुमची गरज काय? प्राध्यापक, डॉ राजू वैश्य, वरिष्ठ सल्लागार, ऑर्थोपेडिक्स आणि जॉइंट रिप्लेसमेंट, इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्स, नवी दिल्ली यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले की, हे संशोधन एक दिनचर्या तयार करण्यासाठी उत्तम आहे. अर्थातच सामान्य मार्गदर्शक पाळून आपण सुदृढ होण्यासाठी प्रयत्न करू शकतात पण बसणे, उभे राहणे, व्यायाम करणे आणि झोपणे यासाठीच्या वेळा प्रत्येक व्यक्तीच्या विशिष्ट परिस्थिती आणि गरजांनुसार तयार केल्या पाहिजेत.

वय, एकूण आरोग्य स्थिती, शारीरिक क्षमता, व्यवसाय आणि वैयक्तिक प्राधान्ये यासारखे घटक विचारात घेतले पाहिजेत. उदाहरणार्थ, मर्यादित हालचाल असलेल्या वयोवृद्ध व्यक्तीला बसणे आणि उभे राहणे याचा सुद्धा फायदा होऊ शकतो तर शारीरिकदृष्ट्या सक्रिय व्यक्तीला दीर्घकाळ व्यायामाची आवश्यकता असू शकते.

# स्मृतिभ्रंश कसा ओळखावा?

वृद्धापकाळातील सगळ्या बदलांची व्याप्ती मोठी आणि त्यांचे परिणामही अनेक. त्यामुळेच बरेच वेळा एखाद्या वृद्ध व्यक्तीमध्ये होणारे बदल हे स्वाभाविक असतात, ते वयोमानानुसारच आहेत असे कुटुंबीयांना वाटते. परंतु सगळेच काही नॉर्मल नसते. हळू हळू घडणारे बदल कधीकधी तीव्र होतात, त्यांचे स्वरूप बदलते. शारीरिक विकार, वृद्धापकाळात होणारे मानसिक बदल आणि कमी होत जाणाऱ्या बौद्धिक क्षमता या सगळ्याकडे सजगपणे पाहावे लागते. जेव्हा बौद्धिक क्षमतांचा ऱ्हास होऊ लागतो, म्हणजे विस्मरण होऊ लागते, भाषेवर परिणाम होतो, निर्णयक्षमता कमी होते, हिशोब चुकू लागतात, दिशांचे भान राहात नाही, एखादी कृती नियोजनपूर्वक पार पाडता येत नाही; तेव्हा त्या व्यक्तीस स्मृतिभ्रंश झाला असे म्हणतात जसे वय वाढते, तसे शरीरामध्ये अनेक प्रकारचे बदल घडतात, हे आपण सर्व जाणतोच. चेहऱ्यावर सुरकुत्या पडू लागल्या, दात पडू लागले, केस पांढरे झाले, दृष्टी मोतिबिंदूमुळे अधू होऊ लागली की, सर्वसामान्यपणे वय होऊ लागले असे मनात येऊन जाते. या बाह्य बदलांबरोबरच शरीर क्रियांवरही परिणाम होतो. नेहमीची कामे करण्याचासुद्धा वेग कमी होतो, इंद्रियांची संवेदनशीलता कमी होऊ लागते. अनेक कामे एकाच वेळेस करण्याची क्षमता कमी होते. काही प्रमाणात गोष्टी विसरायला होते, नवीन गोष्टी उदा. कॉम्प्युटर, शिकणे कठीण होते. अनेक व्याधी जडतात ते वेगळेच.बौद्धिक क्षमतांबरोबरच स्वभावामध्येही बदल होतो. दैनंदिन जीवनावर व दिनक्रमावर परिणाम होतो, उदा. एकट्याने प्रवास करणे, आर्थिक व्यवहार करणे, स्वयंपाक करणे, तसेच जेवणे, कपडे घालणे, आंघोळ करणे आदी. शरदराव बाजारात भाजी आणायला गेले होते. बराच वेळ झाला, तरी घरी परतले नाहीत म्हणून त्यांचा मुलगा त्यांना शोधायला घराबाहेर पडला. तो कोपऱ्यावर पोहचतो न पोहचतो तोच शेजारच्या बिल्डिंग मधला मित्र त्यांना घेऊन येताना दिसला. तो म्हणाला, अरे, काका मला पार पुलापलीकडे भेटले! गोंधळलेले दिसले. आपण कुठे आहोत, याचे त्यांना भान नव्हते.

# 'या' १०० ग्रॅम फळभाजीच्या सेवनाने झपाट्याने वजन होईल कमी; हृदय राहील निरोगी, ठणठणीत!

रोजच्या आहारात आपण अनेक भाज्यांचा समावेश करत असतो. यात फळभाज्यांपासून ते पालेभाज्यांपर्यंत अनेक भाज्यांचा समावेश असतो. सर्वांनाच माहीत आहे की, हिरव्या भाज्या आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. तोंडली एक लोकप्रिय भाजीचा प्रकार आहे. तसं तर कच्ची तोंडलीदेखील खाल्ली जातात. या तोंडल्याचे आपल्या शरीरासाठी अनेक फायदे आहेत. परवलसारखी दिसणारी ही फळभाजी किंचित लहान आणि मऊ असते. यामध्ये अनेक पोषक घटक असतात, जे आपल्याला मोठ्या आजारांशी लढण्यास मदत करतात. १०० ग्रॅम तोंडलीच्या सेवनाने तुमच्या शरीरात कोणते बदल घडून येऊ शकतात, याच विषयावर हैदराबाद येथील केअर हॉस्पिटल्सच्या आहारतज्ज्ञ जी. सुषमा यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. सविस्तर माहिती आपण जाणून घेऊ आहारतज्ज्ञ जी. सुषमा म्हणतात, आपण तोंडलीची भाजी दररोज खात नाही, परंतु तोंडलीची भाजी आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. तोंडलीच्या भाजीच्या चवीपेक्षाही त्यात जीवनसत्त्वाचे खनिज खूप मोठ्या प्रमाणात आहे. १०० ग्रॅम तोंडलीमध्ये सुमारे १.४ मिलीग्राम लोह, ०/०८ मिलीग्राम व्हिटॅमिन बी -२ , ०.०७ मिलीग्राम व्हिटॅमिन-बी १, १.६ ग्रॅम फायबर आणि ४० मिलीग्राम कॅल्शियम असते. तोंडलीमध्ये व्हिटॅमिन ए, बी १, बी २, सी, पोटॅशिअम, मॅग्नेशिअम यांसारखे अनेक पोषक घटक आहेत. तोंडलीचा आकार जेवढा छोटा आहे, तेवढीच तोंडलीची भाजी चवीला खूप चविष्ट असते. तोंडली अनेक आजारांवर फायदेशीर आहे, त्यामुळे आठवड्यातून काही वेळा ते तुमच्या जेवणात समाविष्ट करण्याचे ध्येय ठेवा. तोंडली खाण्याचे फायदे

१. पचनप्रक्रिया सुधारते

तोंडलीमध्ये फायबर जास्त प्रमाणात असल्यामुळे ते आपली पचनप्रक्रिया सुधारते, त्यामुळे तोंडली अपल्यासाठी फायदेशीर आहे. रोज तोंडली खाल्ल्याने सिडिटीची समस्या होत नाही, यामुळे आपल्या आहारात तोंडलीचा समावेश करणे खूप गरजेचे आहे.



२. वजन कमी करण्यासाठी फायदेशीर

वजन कमी करण्यासाठी तोंडली फायदेशीर आहे. यामध्ये फायबरचे प्रमाण अधिक असते. हे प्रमाण वजन कमी करण्यास उपयुक्त ठरू शकते. तोंडली खाल्ल्याने भूकेवर नियंत्रण येण्यास मदत होते.

३. हृदय राहते निरोगी

तोंडलीमध्ये अनेक पौष्टिक गुणधर्म असतात जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. तोंडली हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी समस्या वाढवणारे फ्री-रॅडिकल्सदेखील कमी करते. तोंडलीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आढळतात, जे अँटी-इम्फेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्मांनी समृद्ध असतात. ते हृदयाचे संरक्षण करतात.

४. डोळ्यांसाठी फायदेशीर

यातील व्हिटॅमिन ए आणि बीटा-कॅरोटीन डोळ्यांसाठी फायदेशीर आहे आणि ते मोतीबिंदूपासून संरक्षण देतात.

मधुमेहाची औषधे घेत असलेल्या व्यक्तींनी संभाव्य परस्पर संवादामुळे मोठ्या प्रमाणात तोंडली सेवन करण्यापूर्वी आरोग्यसेवा प्रदात्याचा सल्ला घ्यावा.

# वजन इतकं वाढलंय की कपडे बसेनासे झालेत? रात्रीच्यावेळी हे पदार्थ खायचे बंद करा, फरक जाणवेल

सध्या वाढलेलं वजन हा चिंतेचा विषय बनला आहे. प्रत्येकजण वाढलेलं वजन कमी कसं करायचं याबद्दल प्रयत्न करताना दिसतो. वाढलेल्या वजनामुळे आपण बेडौल तर दिसतोच पण अनेक असाध्य आजाराही आपल्यला होतात. त्यामुळेच लोक कमी करण्यासाठी कठिण परिश्रम करतात. लोक डायट फॉलो करतात आणि पण एक महत्त्वाची गोष्ट ते विसरतात. की, आपण रात्रीच्यावेळी काही गोष्टींचे सेवन टाळले तर आपले वजन झपाट्याने कमी होऊ शकते. असे कोणते पदार्थ आहेत जे आपण टाळले तर जास्त फरक पडतो हे पाहुयात. तळलेले पदार्थ



तुम्ही रात्रीच्या जेवणात तळलेले पदार्थ खाणे बंद करावे. साधे जेवण असले तरी पापड खाण्यात येतात. आणि बाहेरच्या जेवणात तर हमखास तळलेले पदार्थ आपण खातो. फ्रेंच फ्राईज, स्प्रिंग पोटॅटो आणि बऱ्याच पदार्थांवर आपण ताव मारतो. त्यामुळे दिवसभरच नाहीतर रात्रीच्या वेळीही तेल आणि आणि तेलकट पदार्थ खाणे टाळा.

आईस्क्रीम खाने के बाद कुछ मिठा हो जाये असे म्हणत लोक हमखास गोड खातात. त्यातही उन्हाळा, पावसाळा किंवा हिवाळा सर्वच सिझनमध्ये लोक आईस्क्रीम खातात. पण रात्रीच्या जेवणानंतर आईस्क्रीम खाल तर तुमचे वजन वाढते. कारण, जेवणानंतर आपण झोपतो खाल्लेल्या गोष्टीचे पचन होत नाही.

फ्रोझन फूड जे पदार्थ वर्षभर मिळत नाहीत म्हणून ज्या त्या सिझनमध्ये साठवले जातात, त्यांना फ्रोझन फूड म्हणतात. फ्रोझन फुड बनवण्यासाठी कोणताही पदार्थ घेऊन त्यावर प्रक्रिया करून तो बर्फात साठवला जातो. म्हणजे तो पदार्थ आहे असाच राहतो. असे पदार्थ बाजारात सहज उपलब्ध आहेत. ते खाल्ल्याने तुमचे वजन दुपट्टीने वाढू शकते.

# अवघ्या दीड वर्षांच्या कर्णबधीर चिमुकलीची श्रवणक्षमता आली परत; 'जीन थेरपी' मुळे घडला चमत्कार.!

मागील काही वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात बहिरेपणावर सखोल संशोधन करण्यात येत आहे. जन्मतःच कर्णबधीर असलेल्या व्यक्तींना ऐकू येण्याची क्षमता बहाल करण्यासाठी अथक प्रयत्न केले जात आहेत. आता या प्रयत्नांना कुठेतरी यश मिळाल्याचे चित्र आहे.

त्याचे कारण म्हणजे नुकतीच १८ महिन्यांची एक ब्रिटिश मुलगी जी पूर्णपणे कर्णबधीर म्हणून जन्माला आली होती. ती आता नव्या जीन थेरपीनंतर बरी झाली आहे. ही थेरपी यशस्वी झाल्यामुळे तिला आता ऐकू येत आहे. या चिमुकलीचे नाव ओपल असे आहे. या जीन थेरपीच्या माध्यमातून ऐकण्याची क्षमता परत मिळालेली ती आता सर्वात कमी वयाची व्यक्ती ठरल्याचे सांगितले जात आहे.



चीन आणि संयुक्त अमेरिकेसह जगभरातील वैद्यकीय तज्ज्ञांची टीम अनुवांशिक बहिरेपणा दूर करण्यासाठी आणि ऐकू येण्याची क्षमता व्यक्तीला परत मिळवून देण्यासाठी विविध उपचारांची चाचणी घेत आहेत.ब्रिटिश कान शल्यचिकित्सक मनोहर बॅन्स म्हणाले की, ओपल ही अमेरिकन बायोटेक फर्म रेजेनरॉनद्वारे विकसित थेरपी घेणारी जगातील पहिलीच व्यक्ती ठरली आहे आणि आम्हाला माहित आहे की, जागतिक स्तरावर ही थेरपी घेणारी ती सर्वात कमी वयाची व्यक्ती ठरली आहे.

केंब्रिजमधील डेनब्रुक हॉस्पिटलमध्ये ओपलवर उपचार करण्यात आले. ओपलच्या शस्त्रक्रियेबद्दल बोलताना बॅन्स म्हणाले की, तिच्यावर झालेली शस्त्रक्रिया ही यशस्वी झाली असून ती आता सामान्य श्रवण क्षमतेच्या अगदी जवळ पोहचली आहे.

त्यामुळे, आम्हाला आशा आहे की, ही एक संभाव्य उपचार पद्धत असू शकते. ते पुढे म्हणाले की, अनेक दशकांच्या अथक प्रयत्नांनंतर हे यश आले आहे. 'बहिरेपणाच्या उपचारांमधील हा एक नवीन अध्याय' आहे.

दक्षिण मध्य इंग्लंडमधील ऑक्सफोर्डशायरमधील या लहान मुलीला जन्मतःच अनुवंशिक श्रवणविषयक न्यूरोपॅथीशी संबंधित समस्या होती. जी कानाच्या आतील बाजूकडून मेंदूकडे जाणाऱ्या मज्ञातंतूंच्या आवेगाच्या व्यत्ययामुळे होते. ज्यामुळे व्यक्तीला ऐकू येत नाही.

ही समस्या दूर करण्यासाठी रेजेनरॉनची नव्या युगातील जीन थेरपी कानामध्ये जनुकाची कार्यरत प्रत वितरीत करण्याचे काम करते. बॅन्स पुढे म्हणाले की, मागील वर्षातील सप्टेंबरमध्ये ओपलवर शस्त्रक्रिया करण्यात आल्यानंतर आता तिची श्रवण क्षमता सामान्य श्रवण क्षमतेच्या अगदी जवळ पोहचली आहे. शिवाय, त्यात आणखी सुधारणा होण्याची आशा आहे.

# महिलांच्या शरीरावर दिसणारी सूज असू शकते या गंभीर आजाराची चाहूल, जाणून घ्या डीरि आजाराबद्दल

आज जागतिक लुपस दिवस आहे. लुपस हा एक आजार असून तो शरीरातील रोगप्रतिकारशक्तीमुळे होते. शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती स्वतःच्याच अवयवांवर हल्ला चढवते. तेव्हा लुपस विकाराची लागण होते. हा एक वातरोग असून पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये जास्त आढळतो.

गांभिर्याची गोष्ट म्हणजे हा आजार लहान वयातील मुलींमध्येही आढळतो. चेहऱ्यावर फुलपाखराच्या आकाराचे लाल चट्टे (बटरफ्लाय रॅश) येणे सुरू होते हे या विकारांचे प्रमुख लक्षण आहे.ल्युपस नक्की काय आहे?




ल्युपस हा एक स्वयंप्रतिकार आजार आहे, ज्यामुळेशरीराचीरोगप्रतिकारक शक्ती शरीरातील निरोगी पेशींना आजारी पाडते. यामुळे सांधे, स्नायू, त्वचा, मूत्रपिंड, हृदय आणि मेंदू यासह अनेक अवयवांमध्ये सूज आणि वेदना होऊ शकतात. हा आजार महिलांमध्ये जास्त दिसून येतो. अशा स्थितीत त्याची माहिती घेणे अत्यंत आवश्यक आहे.

या गंभीर आजाराची लक्षणे कोणती आहेत?महिलांमध्ये टक्कल पडणे हातांच्या बोटांचा रंग निळा, काळा होणे हृदय वा फुफ्फुसात पाणी जमा होऊन धाप लागणे सांधे दुखणे-सुजणे व अकडणे वारंवार ताप येणे चेहेऱ्यावर लाल चट्टे येणे केस गळणे डोकं दुखणे फिट येणे पक्षाघात होणे मानसिक आजार या आजारापासून दूर रहायचे असेल तर इतकं केलंच पाहिजे शरीरासाठी आरोग्यदायी ठरतील अशाच गोष्टींचे सेवन करा आयुष्यभर व्यायाम आणि योगासनांचा दिनक्रम ठेवा धूम्रपान आणि अल्कोहोलचे सेवन टाळा.

# महात्मा बसवेश्वरांचे अनुभव मंटप जगातील पहिली संसद सुप्रसिद्ध शरण साहित्यिक डॉ. भीमराव पाटील

लातूर :– महात्मा बसवेश्वरांनी स्थापित केलेले अनुभव मंटप ही जगातील पहिली संसद होय असे प्रतिपादन सुप्रसिद्ध शरण साहित्याचे अभ्यासक डॉ. भीमराव पाटील यांनी केले. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित आय. क्यु. ए. सी. आणि जयंती उत्सव समिती, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या ९१९ जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान मुलांच्या अभ्यासिकेमध्ये आयोजित करण्यात आले होते यावेळी जागतिक लोकशाहीचे जनक: महात्मा बसवेश्वर या विषयावर ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर उद्घाटक म्हणून श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर आणि अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रमुख उपस्थिती म्हणून संचालक बाबुराव तरगुडे, संचालक ॲड. काशिनाथ साखरे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, जयंती उत्सव समिती समन्वयक प्रा. धोंडीबा भूरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर संगीत विभागातील प्रा. विश्वनाथ स्वामी आणि प्रा. गोविंद पवार यांनी बसवेश्वरांची आरती आणि स्वागत गीत सादर केले.





पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांनी अठरापगड जाती धर्मातील स्त्री–पुरुषांसाठी वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी अनुभव मंटप नावाची सामाजिक आणि सांस्कृतिक विचारपीठ बाराव्या शतकात स्थापन केले. यामध्ये ७७० शरण सदस्य होते. यामध्ये ७० शरणीचा समावेश होता. इंग्लंडच्या पार्लमेंटच्या अगोदर महात्मा बसवेश्वरांनी ही संसद भरवली. जागतिक लोकशाहीची संसद होण्याचा बहुमान अनुभव मंटपाला मिळतो. स्त्री–पुरुष समानता, स्वातंत्र्य, समान प्रतिष्ठा, कायकाचे श्रेष्ठत्व, स्वातंत्र्य समता, न्याय, बंधुता, मानवता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांची रुजवणूक या संसदेत व्हायचची. आजच्या भारतीय राज्यघटनेत महात्मा बसवेश्वरांच्या अनेक तत्वांचा उल्लेख आपल्याला सापडतो असेही ते म्हणाले. आपल्या उद्घाटनपर मार्गदर्शनात शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, महात्मा बसवेश्वर हे कृतिशील सामाजिक सुधारक होते. त्यांच्या आचार विचार आणि तत्त्वज्ञानाची आजच्या काळातही नितांत आवश्यकता आहे. बसवेश्वरांचे एक जरी वचन आपल्या नित्य व्यवहारात आचरणात आणावे तरच जयंती महोत्सवाचा हेतू पूर्ण होईल असेही ते म्हणाले. आपल्या अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, तथागत गौतम बुद्धांनी इसवी सन पूर्व काळात गणराज्याच्या स्वरूपात लोकशाहीचा प्रयोग केल. त्याप्रमाणे मध्ययुगात बसवेश्वरांनी समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न केले. सर्वसामान्य जनतेला त्यांचे अधिकार न्याय मिळवून देण्यासाठी बसवेश्वरांनी प्रयत्न केले असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. धोंडीबा भूरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केला. प्रमुख अतिथींचा परिचय डॉ. टी घनश्याम यांनी करून दिला तर आभार कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती महोत्सव समिती सदस्य आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

## फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने रद्द करण्याची मागणी कृषी सेवा केंद्राकडून शेतकऱ्यांना बोगस बियाणे देऊन

फसवणूक किनवट.प्रतिनिधी. (शेख शौकत) नफेखोरांना चाप लावण्यासाठी कांही कापूस बियाणे कंपनीचे प्रतिनिधी शेतकऱ्यांच्या दारी जाऊन बियाण्यांची बुकींग करीत आहेत. दरवर्षीच किनवट तालुक्यातील कांही शासनमान्य परवानाधारक कृषी सेवा केंद्राकडून शेतकर्यांना बोगस बियाणे देऊन फसवणूक करीत असल्याने अनेक शेतकऱ्यांचा कल हा कंपनीच्या एजन्टाकडेच ओळल्याचे दिसून येते. शेतकर्यांनी खातरजमा करुनच विश्वासपात्र कम्पनीच्या ऑनलाईन बिलासह बियाणे खरेदी करण्यावर जोर दिला असल्याचेही वृत्त आहे. तालुका कृषी कार्यालय आणि पंचायत समितीच्या कृषी विभागाच्या संयुक्त भरारी पथकाने शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही याची दक्षता घेऊन विश्वासपात्र नसलेल्या कृषी सेवा केंद्रांसह फिरत्या कंपनी प्रतिनिधीवर लक्ष ठेवण्याची नितांत आवश्यकता असल्याचा पत्रव्यवहार सुजान पत्रकारांनी केला आहे. तालुक्यातील बहूदा प्रमुख बाजारपेठेतील कांही परवानाधारक कृषी सेवा केंद्रातून प्रमाणिकरण केलेल्या बियाण्याबरोबरच बोगस बियाण्याची बिनधास्त विक्री केली जाते. शेतकऱ्यांची ओरड झाल्यानंतर त्या वादग्रस्त दुकान चालकाच्या परवान्याचा प्राधिकार



गोठऊन काळ्या यादीत टाकण्याऐवजी ते बियाणे दोन महिने विक्री न करण्याची कार्यवाही केली जाते. त्यानंतर तो दुकानदार बियाणे विकतो वा विकत नाही याकडे कोणाचेही लक्ष नसते. म्हणून बोगस बियाणे विक्री थांबली का ? तर बिलकूल नाही. उलटपक्षी बियाण्याची कृत्रीम टंचाई करुन जादा दराने छुप्या मार्गाने गरजू शेतकऱ्याच्या माथी बियाणे मारले जाते. रासायनिक खतांच्या बाबतीतही ओरीजनल कि बोगस ? यावरही वादंग उफाळले होते. कृषी विभागाच्या भरारी पथकाने प्रत्येक कृषी सेवा केंद्रावर कर्मचाऱ्यांच्या बैठ्या पथकाच्या नियुक्त्यांचे प्रयोजन करुन जबाबदाऱ्या निश्चीत केल्याशिवाय बोगसगीरी थांबणार नाही. दलालमुक्त व्यवहार हे शासनाचे धोरण आहे. कंपनीने जर नफाखोरी थांबऊन शेतकऱ्यांच्या दारावर जाऊन मापकदरात बियाणे पुरवण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले असेल तर स्वागतार्हच म्हणावे लागेल. फक्त फसवणूक होणार नाही याबद्दलची सर्वांनीच जागरुकता राखणे काळाची आवश्यकता आहे. परवानाधारक नफाखोरीच्या दुकानचालकाकडून जर उघडउघड फसवणूक होत असेल तर त्यापेक्षाघ व्यापार्यांचा अडसर थांबऊन प्रमाणिकरण केलेले बियाणे विक्री करणाऱ्या कम्पन्या कम्पनी टू थेट शेतकरी असा व्यवहार होत असेल तर तोच बरा म्हणण्याची वेळ आली आहे. फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने कायमचे रद्दबातल करुन फौजदारी कारवाई का केली जात नाही ? ती करायला हवी. अशी शेतकर्यांची मागणी जोर धरु लागली आहे.

## जगतजोती महात्मा बसवेश्वर यांच्या ९१९ वी जयंती निमित्त भव्य मोटार सायकल रॅली संपन्न

लातूर :– जगतजोती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ९१९ व्या जयंती निमित्त भव्य मोटार सायकल रॅलीचे आयोजन सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने बालाजीअप्पा पिंपळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली होती मोटार सायकल रॅलीची सुरूवात महात्मा बसवेश्वर महाविद्यालय जवळील सिन्हांसन आरूढ महात्मा बसवेश्वर पुतळ्याचे पूजन व अभिवादन करून सुरू करण्यात आली. महात्मा गांधी चौक, गोलाई , शाहू चौक, सम्राट चौक, गुळ मार्केट, गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजीव गांधी चौक, महात्मा बसवेश्वर चौक येथे समारोप करण्यात आला. या भव्य रॅलीत गणेश बोमने रायवाडीकर, विश्वास आंबेकर, प्रदीप उपासे,लक्ष्मीकांत चौंडा, नितीन मोहनाळे, नागेश कळसे, संकेत बुलबुले, चंदू बुलबुले , कृष्णा जाधव, महेश बुलबुले, महेश झुंजारे, विशाल गायकवाड, प्रशांत बुलबुले, अमर लखादिवे, सुमित कोरे, संजय मुळे, प्रहलाद कोकाटे, पवन नकाते, बालाजी खानापुरे, प्रविण स्वामी, निलेश हकांरे , शिवकुमार व्यवहारे, विशाल गायकवाड, विशाल पाटील भाऊ नकाते आदी सह लातूर शहर व परिसरातील युवकांची, सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती मोठया संख्येने होती






लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने भगवान परशुराम व महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली यावेळी अध्यक्ष अँड शरद इंगळे, सचिव अँड प्रदिपसिंह गंगणे, उपाध्यक्ष अँड आनंद खांडेकर, अँड मनिषा दिवे पाटील, ग्रंथालय सचिव अँड विजय साबळे,सहसचिव अँड तृप्ती इटकरी, अँड धनराज नागरगोजे , अँड वाहेद सय्यद, अँड महेश खंणगे, अँड मनोज जाधव, अँड अविनाश सुर्यवंशी, अँड त्रंबक सरदे, अँड किरण कांबळे, अँड परिक्षीत देशपांडे आदी उपस्थित होते

## मतदान यंत्र सुरक्षा कक्ष परिसराची जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी

लातूर : – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर लोकसभा मतदारसंघात ७ मे २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. त्यानंतर लातूर लोकसभा मतदारसंघ अंतर्गत सर्व मतदान केंद्रांवरील मतदान यंत्रे लातूर शहरातील बार्शी रोडवरील शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन येथील सुरक्षा कक्षात ठेवण्यात आली आहेत. येथील सुरक्षा व्यवस्थेची जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी आढावा घेतला. मतदान यंत्रे ठेवण्यात आलेल्या सुरक्षा कक्षाच्या परिसरात केंद्रीय राखीव पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि जिल्हा पोलीस दलामार्फत त्रिस्तरीय बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी सुरक्षा कक्ष असलेल्या इमारतीच्या परिसरातील बंदोबस्ताची पाहणी केली. तसेच अनुषंगिक सूचना दिल्या. उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना सुरक्षा कक्षाचे



थेट चित्रण पाहण्यासाठी स्वतंत्र कक्ष याठिकाणी तयार करण्यात आला असून या कक्षालाही जिल्हाधिकारी यांनी भेट दिली.

## गोदावरी नदीत कोसळली जीप, दोघांना जलसमाधी

नांदेड : प्रतिनिधी टायर फुटल्याने भरधाव क्रूझर जीप पुलावरून गोदावरी नदीत कोसळल्याने झालेल्या भीषण दुर्घटनेत जीपमधील दोघांना जलसमाधी मिळाली. ही दुर्घटना शुक्रवारी सायंकाळी ७ च्या सुमारास येळी–महाटीच्या पुलावर घडली. त्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. मृतांमध्ये जीपचालक आणखी एका युवकाचा समावेश आहे.ही क्रूझर जीप शिखाचीवाडी (ता. मुदखेड) येथील असून, शिखाचीवाडी येथील जीपचालक आणि येळी (ता. लोहा) येथील युवक चिलपिंपरी येथे बोळवण सोडून शुक्रवारी सायंकाळी येळीकडे निघाले होते. भरधाव वेगातील ही क्रूझर जीप येळी–महाटीच्या पुलावर आली असता अचानक टायर फुटले आणि जीप पुलावरून गोदावरी नदीत कोसळली. या घटनेचे वृत्त समजताच नजीकच्या ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मदत व बचावकार्य सुरू केले.

# मालमत्ता कराच्या अभिलेख्यांमधील त्रुटींच्या दुरुस्तीसाठी मनपाचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी: मनपाच्या वतीने मालमत्ता सर्वेक्षण व पुनर्मुल्यांकनाचे काम करण्यात आलेले आहे. यात त्रुटी असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी येत असल्याने दुरुस्तीची मोहीम हाती घेण्यात आली आहे.ज्या नागरिकांचे आक्षेप आहेत त्या नागरिकांनी दिलेल्या कालावधीत संपर्क साधून आपले अभिलेखे दुरुस्त करून घेण्याचे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

लातूर शहर मनपाच्या वतीने २०१५ यावर्षी मालमत्ता सर्वेक्षण व पुनर्मूल्यांकनाचे काम हाती घेण्यात आले होते. २०१७– १८ या आर्थिक वर्षात हे काम पूर्ण झाले. त्यावर्षी मालमत्ताधारकांना विशेष नोटीसा देऊन आक्षेप मागविण्यात आले होते. त्या आक्षेपावर सुनावणी घेवून व आक्षेपांचे निराकरण करून प्रत्यक्षात कर वसुली सुरुवात करण्यात आली आहे.

सध्या मनपाकडे उपलब्ध असलेल्या मालमत्ता कर मागणी अभिलेख्यांमध्ये काही प्रमाणात त्रुटी असल्याच्या तक्रारी येत आहेत. मालमत्तेची नोंद धारकाच्या नावे नसणे,कर आकारणीमध्ये जास्तीचा दर लावणे,मालमत्तेचे मोजमाप चुकीचे असणे, वापराच्या प्रकारामध्ये बदल तसेच पाणीपट्टी कर आकारणीबाबत नागरिकांच्या तक्रारी येत आहेत.

मालमत्ता कर वसुलीसाठी हे अभिलेखे दुरुस्त करणे आवश्यक आहे.नागरिक मालमत्ता कर भरतेवेळी तक्रारी करत आहेत.या तक्रारींचे निराकरण करून डेटा दुरुस्त करण्याच्या उद्देशाने मनपाच्या वतीने क्षेत्रीय कार्यालयामध्ये विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. मालमत्ताधारकांनी त्या दिवशी क्षेत्रीय कार्यालयात पुराव्यासह उपस्थित राहून अर्ज करणे आवश्यक आहे.

ज्या मालमत्ता धारकास धारक म्हणून मालमत्ता कराचे मागणी बिल येत आहे अशा मालमत्ता धारकांनी अर्जासोबत मालकी हक्काबाबत खरेदीखत,सातबारा,सिटी सर्वे उतारा,विकास कर व हस्तांतरण कर भरणा केल्याची पावती,सूचना पत्रकाची प्रत सादर करावी. मालमत्ता धारकांनी आपल्या मालमत्तेची नोंद नियमानुसार मनपामध्ये केलेली नसेल तर खरेदी खत,सातबारा उतारा, सिटी सर्वे उतारा अशा प्रकारचे मालकी हक्काचे दस्तावेद दस्तावेज सादर करून नियमानुसार शुल्काचा भरणा करून मनपा कर मागणी अभिलेख्यांमध्ये नोंद करून घ्यावी.मागील आर्थिक वर्षात कराचा भरणा केलेला असतानाही मागणी बिलामध्ये थकीत कराचा समावेश झाला असेल तर अशा मालमत्ताधारकांनी आपल्याकडील कर भरणा केल्याची पावती सादर करावी. चुकीच्या कर आकारणीबाबत मालमाता धारकांची तक्रार असेल तर अर्जासोबत बांधकाम परवान्याची प्रत,बांधकाम नकाशा व पूर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर करावे. वापराच्या प्रकारामध्ये बदल झाला असल्यास मालमत्ताधारकांनी अर्जासोबत बांधकाम परवाना प्रत, बांधकाम नकाशा व बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जोडावे. व्यवसाय बंद केल्याबाबतचा पुरावा सादर करावा.कर मागणी बिलामध्ये नावात दुरुस्ती करणे असल्यास खरेदीखत,सातबारा किंवा सिटी सर्वे उतारा,विकास कर व हस्तांतरण कर भरणा केल्याची पावती, सन २०२३– २४ मध्ये मालमत्ता कराचा भरणा केलेली पावती व सूचना पत्रकाची प्रत सादर करावी. नळ जोडणी नसताना किंवा नळ जोडणी असून पाणीपट्टी कराचे मागणी बिल जास्तीचे येत असल्यास अशा मालमत्ता धारकांनी पाणीपट्टी कर भरणा केल्याची पावती सादर करावी.अर्जासोबत सादर केलेल्या पुराव्यांची अधिकाऱ्यांकडून पडताळणी करून अर्जावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.त्यामुळे मालमत्ता धारकांनी दिलेल्या तारखेस क्षेत्रीय कार्यालयात आपली कागदपत्रे व अर्ज सादर करावेत.अर्ज सादर न केल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून मालमत्ता कराची वसुली सक्तीने करण्यात येईल,असे मनपाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

ए झोनमधील नागरिकांना सोमवार दि.१३ मे रोजी मनपा मुख्य कार्यालयात अर्ज सादर करता येणार आहेत.बी झोनमधील नागरिकांना ठाकरे चौकातील मनपा शाळेत मंगळवार दि.१४ मे रोजी अर्ज सादर करावयाचे आहेत.सी झोनमधील नागरिकांनी डालडा फॅक्टरी परिसरात असणाऱ्या पाण्याच्या टाकी जवळील कार्यालयात बुधवार दि.१५ मे रोजी तर डी झोन मधील नागरिकांनी दि.१६ मे रोजी गांधी चौकातील पाण्याच्या टाकिजवळ असणाऱ्या क्षेत्रीय कार्यालयात कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत,असे मनपाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE